ORIGINAL RESEARCH PAPER

Education

# "पश्चिम विदर्भाच्या आर्थिक विकासात सोयाबीन उत्पादक शेतक-यांच्या योगदानाचे विश्लेषणात्मक अध्ययन"

KEY WORDS:

| | |
|---|---|
| बबन काशीनाथ कदम | डॉ. ताम्हणे हॉस्पीटलजवळ, गोरक्षण रोड, अकोला |
| डॉ. श्रीप्रभू जी. चापके | प्राचार्य, श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालय, अकोला |
| डॉ. महेश चं. डाबरे | सहयोगी प्राध्यापक, श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालय, अकोला |

सारांश

भारताची ओळख ही कृषीप्रधान देश म्हणून आहे. भूईमूग, तीळ, जवस या तेलबियांसोबतच सोयाबीनचे सुध्दा उत्पादन भारतात घेतले जाते. मध्यप्रदेश, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक या आणि इतर राज्यांमध्ये शेतकरी सोयाबीन तेलबियांचे उत्पादन घेतात. म्हणूनच संशोधकाने सोयाबीन उत्पादक शेतक-यांच्या पश्चिम विदर्भाच्या आर्थिक विकासाचा अभ्यास करतांना संशोधनाच्या सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला. सोयाबीन तेल उद्योगास लागणारा कच्चा माल याठिकाणी पुरेशा प्रमाणात उत्पादित होतो काय? याचे अध्ययन याठिकाणी केले गेले. पश्चिम विदर्भातील जवळपास पाचशे शेतक-यांकडून प्रश्नावली, प्रत्यक्ष मुलाखत आणि निरीक्षणाअंती प्राथमिक सामग्री गोळा केली गेली. वित्तीय सामग्री वर्तमानपत्रे, अहवाल, पुस्तके आणि इंटरनेटच्या माध्यमातून गोळा केली गेली. उपलब्ध माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केल्यानंतर असे लक्षात आले की, अनेक शेतकरी व शेतमजूर सोयाबीनचे उत्पादन घेतात.

**मुख्य शब्द :** सोयाबीन, शेतकरी, कृषी, कच्चा माल, शेतमालावर प्रक्रिया इ.

**प्रस्तावना :-** भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतामध्ये कृषी उत्पादनांवरील प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य दिल्या गेले. सोयाबीन तेल निर्मिती उद्योग हा त्यातील एक. सोयाबीनला "निसर्गाने मानवाला दिलेली देणगी" म्हणून संबोधिल्या जाते. सोयाबीनला पाश्चात्य देशांमध्ये 'कामधेनू' आणि चीनमध्ये 'मातीतील सोने' संबोधिले जाते.

सोयाबीनचे मूलस्थान चीन आहे. 'शू' किंवा 'सोऊ' या चिनी शब्दावरून 'सोयाबीन' हे त्याचे नाव पडले. प्राचीन काळापासून चीन, मांचुरिया आणि कोरिया या देशातील लोकांचे सोयाबीन हे महत्वाचे अन्नधान्य आहे. चीनचा सम्राट 'शेभुंग' याने सोयाबीनचा प्रथम उल्लेख ख्रिस्तपूर्व 2838 साली चिनी पुस्तकात केला आहे. चीनच्या संस्कृतीत पाच पवित्र धान्यांपैकी सोयाबीन हे एक धान्य मानण्यात येत असे. सातव्या शतकात सोयाबीनने जपानमध्ये प्रवेश केला. त्यानंतर इंडोनेशिया, युगांडा, नायजेरिया, इटली, रशिया, आस्ट्रेलिया, फिलीपाईन्स, व्हिएतनाम, थायलंड, मलेशिया, ब्रम्हदेश, नेपाळ, अमेरिका आणि उत्तर भारतात सोयाबीनचा प्रसार झाला.

इ.स. 2000 पर्यंत जागतिक कृषी क्षेत्राच्या 1.5 प्रतिशत क्षेत्र सोयाबीनच्या लागवडीखाली होते आणि इ.स. 2012 पर्यंत त्यात वाढ होऊन ते 2.2 प्रतिशत झाले. याच काळामध्ये जागतिक उत्पादन 253.1 मिलियन मेट्रिक टनापर्यंत पोहोचले. या काळातील निर्यत ही 53.2 बिलियन अमेरिकन डॉलर पर्यंत पोहोचली. जागतिक स्तरावर उत्पादित होणा-या एकूण सोयाबीनच्या जवळ जवळ 87 प्रतिशत सोयाबीनचा उपयोग सोयाचे खाद्यपदार्थ आणि सोयातेल यासाठी केला जातो. उरलेल्या 13 प्रतिशत सोयाबीनचा उपयोग लोकांव्दारे सरळ उपभोगासाठी केला जातो.

जागतिक क्षेत्रामध्ये तेलबियांच्या उत्पादनात भारताची महत्वपूर्ण भूमिका आहे. भारतामध्ये मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, कर्नाटक, हरियाणा आणि प. बंगाल या राज्यांमध्ये सोयाबीनचे उत्पादन घेतले जाते. 2015 च्या आकडेवारीनुसार जागतिक स्तरावर सोयाबीनच्या उत्पादनात भारताचा पाचवा क्रमांक लागतो. भारतातील एकूण सोयाबीन उत्पादनाच्या 89 प्रतिशत उत्पादन हे मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रातून घेतले जाते. मध्यप्रदेश प्रथमस्थानी तर महाराष्ट्र हा व्दितीयस्थानी आहे.

**विषयाचे महत्व :-** ख्रिस्तपूर्व अकराव्या शतकात उत्तर चीनमध्ये सोयाबीनची लागवड करीत असत. मानवाला माहित असलेले हे पहिले पिक आहे. चीनच्या संस्कृतीत पाच पवित्र धान्यांपैकी सोयाबीन हे एक धान्य मानण्यात येत असे. सोयाबीनचा उपयोग अन्न व औषधीसाठी होत असे. त्यानंतर अनेक शतके चिनी शेतक-यांनी रानटी सोयाबीनचे उत्तम सोयाबीनमध्ये परिवर्तन केले. त्यानंतर जगभर लोकांना सोयाबीनच्या बहुमोल गुणधर्माची ओळख पटली. ख्रिस्तानंतर पहिल्या शतकात सोयाबीनचा प्रसार मध्य व दक्षिण चीनमध्ये आणि कोरियात झाला. सातव्या शतकात सोयाबीनने जपानमध्ये प्रवेश केला. त्यानंतर इंडोनेशिया, फिलीपाईन्स, व्हिएतनाम, थायलंड, मलेशिया, ब्रम्हदेश, नेपाळ व उत्तर भारतात सोयाबीनचा प्रसार झाला. प्राचीन काळापासून आशियात सोयाबीनपासून बनविलेले खाद्यपदार्थ मीसो, टेम्पेह व टोकू अतिशय लोकप्रिय आहेत. इ.स. सन 1000 मध्ये मध्य चीनमधून सोयाबीन तिबेटचे पठार ओलांडून व्यापा-यांनी भारतात आणले. दुस-या मार्गाने सोयाबीन, ब्रम्हदेशातून आसाम, मणिपूर, नागा टेकड्या व बांगलादेशात आणले. त्याचा उत्तर भारतात प्रसार झाला. हे सोयाबीन काळ्या रंगाचे होते. त्यामुळे त्याला 'काला तूर' किंवा 'भाट', बंगाली भाषेत 'गारी-कुले' आणि सिंहलीज भाषेत 'भाटवाण' म्हणत असत. मध्य भारतात सोयाबीन जपान, दक्षिण चीन व दक्षिणपूर्व आशियातून आणले. बहुसंख्य भारतीय लोक शाकाहारी असल्याने त्यांचे आहारात प्रथिनाची कमतरता असते. ही तूट सोयाबीनच्या प्रथीनाने भरून निघते. त्यामुळे भारतातील पहाडी

**संशोधन पध्दती :-**

संशोधनाच्या सर्वेक्षण पध्दतीचा माहिती संकलित करण्याकरिता उपयोग करण्यात आला. प्रत्यक्ष माहितीच्या संकलनासाठी प्रश्नावली, मुलाखत तंत्र आणि निरीक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. संशोधकाने तथ्य संकलनासाठी विविध दैनिके, साप्ताहिके, मासिके, वार्षिकांक, पुस्तके, ग्रंथ, नियतकालिके आणि इतर प्रकाशित साहित्याचे अध्ययन केले. या उद्योगास आवश्यक असणारा कच्चा माल उत्पादित करणारे शेतकरी अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यातून प्रत्येकी शंभर असे एकूण पाचशे शेतकरी दैव निदर्शन पध्दतीने निवडण्यात आलेत. यामध्ये पश्चिम विदर्भातील प्रत्येक तालुक्यातून शेतकरी निवडले गेलेत.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. सोयाबीन तेल निर्मिती उद्योगास आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाच्या उपलब्धतेबाबतचे अध्ययन करणे व शेतक-यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा आढावा घेणे.
2. सोयाबीन उत्पादकांना कर्जपुरवठा करणा-या विविध संस्थांचा तपास करणे.

**सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन :-**

**सारणी क्र. 1**
**गावातील सोयाबीन खालील शेतजमीन**

| अ. क्र. | विवरण | उत्तरदात्यांची संख्या व प्रतिशत प्रमाण | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकोला | अमरावती | बुलडाणा | वाशीम | यवतमाळ | |
| 1 | 0-200 | 37 (37%) | 19 (19%) | 23 (23%) | 27 (27%) | 22 (22%) | 128 (25.6%) |
| 2 | 200-400 | 18 (18%) | 24 (24%) | 17 (17%) | 14 (14%) | 15 (15%) | 88 (17.7%) |
| 3 | 400-600 | 12 (12%) | 26 (26%) | 13 (13%) | 17 (17%) | 09 (09%) | 77 (15.5%) |
| 4 | 600-800 | 09 (09%) | 15 (15%) | 18 (18%) | 21 (21%) | 20 (20%) | 83 (16.6%) |
| 5 | 800-1000 | 16 (16%) | 07 (07%) | 14 (14%) | 08 (08%) | 23 (23%) | 68 (13.6%) |
| 6 | 1000 पेक्षा जास्त | 08 (08%) | 08 (08%) | 15 (15%) | 13 (13%) | 11 (11%) | 55 (11%) |
| | एकूण | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 500 |
| | | (100%) | (100%) | (100%) | (100%) | (100%) | (100%) |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की, पश्चिम विदर्भातील पाचही जिल्ह्यांमध्ये ज्या ठिकाणी सोयाबीनचे उत्पादन घेतले जाते तेथील उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांचे गावात 0-200 एकर एकूण सोयाबीन खालील शेतजमीन असणा-या उत्तरदात्यांचे प्रमाण 25.6 प्रतिशत इतके आहे. 200-400 एकर शेतजमीन असणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 17.7 प्रतिशत इतके आहे. 400-600 एकर शेतजमीन असणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 15.5 प्रतिशत इतके आहे. 600-800 एकर शेतजमीन असणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 16.6 प्रतिशत इतके आहे. 800-1000 एकर शेतजमीन असणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 13.6 प्रतिशत इतके आहे. 1000 एकरपेक्षा जास्त शेतजमीन असणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 11 प्रतिशत इतके आहे.

**सारणी क्र. 2**
**सोयाबीन घेणा-या शेतक-यांची संख्या**

| अ. क्र. | विवरण | उत्तरदात्यांची संख्या व प्रतिशत प्रमाण | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकोला | अमरावती | बुलडाणा | वाशीम | यवतमाळ | |
| 1 | 0-100 | 12 (12%) | 10 (10%) | 17 (17%) | 32 (32%) | 24 (24%) | 95 (19%) |
| 2 | 100-200 | 21 (21%) | 18 (18%) | 13 (13%) | 07 (07%) | 11 (11%) | 70 (14%) |
| 3 | 200-300 | 19 (19%) | 23 (23%) | 15 (15%) | 19 (19%) | 18 (18%) | 94 (18.8%) |
| 4 | 300-400 | 24 (24%) | 12 (12%) | 28 (28%) | 14 (14%) | 23 (23%) | 101 (20.2%) |
| 5 | 400-500 | 11 (11%) | 27 (27%) | 16 (16%) | 20 (20%) | 09 (09%) | 83 (16.6%) |
| 6 | 500 पेक्षा जास्त | 13 (13%) | 10 (10%) | 11 (11%) | 08 (08%) | 15 (15%) | 57 (11.4%) |
| | एकूण | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 500 (100%) |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, पश्चिम विदर्भातील ज्या गावांमधील सोयाबीनचे पिक घेणा-या उत्तरदात्यांची निवड केली आहे, त्यांनी दिलेल्या प्रतिसादावरुन त्यांच्या गावात 0-100 शेतक-यांची संख्या आहे असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 19 प्रतिशत इतके आहे. 100-200 शेतकरी आहेत असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 14 प्रतिशत इतके आहे. 200-300 शेतकरी आहेत असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 18.8 प्रतिशत इतके आहे. 300-400 शेतकरी आहेत असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 20.2 प्रतिशत इतके आहे. 400-500 शेतकरी आहेत असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 16.6 प्रतिशत इतके आहे. 500 पेक्षा जास्त शेतकरी आहेत असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे प्रमाण 11.4 प्रतिशत आहे.

**सारणी क्र. 3**

**शासकीय योजना**

| अ. क्र. | विवरण | उत्तरदात्यांची संख्या व प्रतिशत प्रमाण | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकोला | अमरावती | बुलडाणा | वाशीम | यवतमाळ | |
| 1 | होय | 39 (39%) | 47 (47%) | 60 (60%) | 54 (54%) | 34 (34%) | 234 (46.8%) |
| 2 | नाही | 61 (61%) | 53 (53%) | 40 (40%) | 46 (46%) | 66 (66%) | 266 (53.2%) |
| | एकूण | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 500 (100%) |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, एकूण 46.8 प्रतिशत उत्तरदात्यांना शासकीय योजनांची माहीती आहे. एकूण 53.2 प्रतिशत उत्तरदात्यांना शासकीय योजनांची माहिती नाही.

संपूर्ण विश्लेषणानंतर असे लक्षात येते की, जे उत्तरदाते भाडेपट्टीवर सोयाबीनचे पिक घेतात त्यांना याबद्दल काहिच माहिती नाही. ज्यांची स्वत:ची शेतजमीन आहे त्यांना बहुतांशी शासकीय योजनांची माहिती आहे व ते त्यांचा लाभ घेतात. सोयाबीनच्या बाबतीत असलेली पिक विमा योजना, महाबीज मंडळाच्या योजना, संजीवन सोयाबीन, कृषीधन सोयाबीन, सेंद्रिय शेती ग्रामीण योजना, पन्नास टक्के सबसिडी योजना, विविध औषधांवर सूट, पिक प्रात्यक्षिक प्रकल्प, पॅकेज योजना आणि कृषी महामंडळाची योजना इत्यादीबद्दल उत्तरदात्यांना माहिती आहे.

**सारणी क्र. 4**

**एक एकर शेतीचा उत्पादन खर्च (लागवड)**

| अ. क्र. | विवरण (रूपयात) | उत्तरदात्यांची संख्या व प्रतिशत प्रमाण | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकोला | अमरावती | बुलडाणा | वाशीम | यवतमाळ | |
| 1 | 0-10000 | 59 (59%) | 42 (42%) | 34 (34%) | 43 (43%) | 52 (52%) | 230 (46%) |
| 2 | 10000-20000 | 31 (31%) | 29 (29%) | 37 (37%) | 35 (35%) | 28 (28%) | 160 (32%) |
| 3 | 20000-30000 | 07 (07%) | 21 (21%) | 24 (24%) | 19 (19%) | 14 (14%) | 85 (17%) |
| 4 | 30000 पेक्षा जास्त | 03 (03%) | 08 (08%) | 05 (05%) | 03 (03%) | 06 (06%) | 25 (5%) |
| | एकूण | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 500 (100%) |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, पश्चिम विदर्भात एक एकर शेतीचा एकूण लागवड खर्च 0 -10000 रूपयांच्या दरम्यान येतो असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 46 प्रतिशत आहे. रूपये 10,000-20,000 च्या दरम्यान लागवड खर्च येतो असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 32 प्रतिशत इतके आहे. रूपये 20,000-30,000 च्या दरम्यान लागवड खर्च येतो असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 17 प्रतिशत आहे. रूपये 30000 पेक्षा जास्त लागवड खर्च येतो असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 05% इतके आहे.

**सारणी क्र. 5**

**निर्यातीस सरकारतर्फे प्रोत्साहन**

| अ. क्र. | विवरण | उत्तरदात्यांची संख्या व प्रतिशत प्रमाण | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकोला | अमरावती | बुलडाणा | वाशीम | यवतमाळ | |
| 1 | नेहमीच | 24 (24%) | 07 (07%) | 19 (19%) | 25 (25%) | 12 (12%) | 87 (17.4%) |
| 2 | कधी-कधी | 31 (31%) | 41 (41%) | 38 (38%) | 26 (26%) | 46 (46%) | 182 (36.4%) |
| 3 | क्वचित | 09 (09%) | 14 (14%) | 22 (22%) | 23 (23%) | 11 (11%) | 79 (15.8%) |
| 4 | कधीच नाही | 36 (36%) | 38 (38%) | 21 (21%) | 26 (26%) | 31 (31%) | 152 (30.4%) |
| | एकूण | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 100 (100%) | 500 (100%) |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, सोयाबीनच्या निर्यातीस सरकारतर्फे नेहमीच प्रोत्साहन मिळते असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 17.4 प्रतिशत आहे. निर्यातीस सरकारतर्फे कधी-कधी प्रोत्साहन मिळते असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 36.4 प्रतिशत आहे. निर्यातीस क्वचित सरकारतर्फे प्रोत्साहन मिळते असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 15.8 प्रतिशत आहे. सरकारतर्फे निर्यातीस कधीच प्रोत्साहन मिळत नाही असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण 30.4 प्रतिशत आहे.

**निष्कर्ष :-**

**1.** सोयाबीन खालील शेतजमीन ही बागायती व कोरडवाहू अशा दोन्ही प्रकारची आहे. काही शेतक-यांकडे अल्प व अत्यल्प शेतजमीन आहे ते केवळ सोयाबीनचेच उत्पादन घेताना दिसून येतात. तर ज्यांचेकडे जास्त शेतजमीन आहे ते सोयाबीन आणि इतर पिकांचेही उत्पादन घेताना दिसून येतात.

सोयाबीन करिता काळी, कसदार, ओल टिकवून ठेवणारी, भुसभुशीत, मध्यम दर्जाची, हलकी मध्यम दर्जाची, सुपिक, जिरायती, भुरकट काळी, साधारण लाल मातीची, पांढरी, डोंगराळ भागातील, खडकाळ, उत्तम निचरा होणारी इत्यादी पैकी कोणत्याही प्रकारची शेतजमीन चालते. उत्पादनात थोडा फार फरक पडतो.

**2.** 400-500 व 500 पेक्षा जास्त सोयाबीन घेणारे शेतकरी गावात आहेत असा प्रतिसाद देणारे उत्तरदाते हे साधारणतः मोठ्या खेड्यातील आहेत.

साधारणतः गावात 600 पेक्षा जास्त शेतमजूर आहेत असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण हे सरासरीच्या 48.6 प्रतिशत इतके आहे. उत्तरदात्यांशी झालेल्या चर्चेनुसार त्यांना शेतमजूरांशी संबंधित अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

**3.** एकूण वार्षिक खर्च रू. 0-15000 च्या दरम्यान असणा-या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात अधिक असून ते 79.8 प्रतिशत आहे. उत्तरदात्यांच्या शेतीचे आकारमान जस-जसे वाढत जाते तस-तसा किड व रोग नियंत्रणावरील वार्षिक खर्च वाढत गेल्याचे निदर्शनास येते.

**4.** संपूर्ण विश्लेषणानंतर असे लक्षात येते की, जे उत्तरदाते भाडेपट्टीवर सोयाबीनचे पिक घेतात त्यांना शासकीय योजनांबद्दल काहिच माहिती नाही. ज्यांची स्वत:ची शेतजमीन आहे त्यांना बहुतांशी शासकीय योजनांची माहिती आहे व ते त्यांचा लाभ घेतात. सोयाबीनच्या बाबतीत असलेली पिक विमा योजना, महाबीज मंडळाच्या योजना, संजीवन सोयाबीन, कृषीधन सोयाबीन, सेंद्रिय शेती ग्रामीण योजना, पन्नास टक्के सबसिडी योजना, विविध औषधांवर सूट, पिक प्रात्यक्षिक प्रकल्प, पॅकेज योजना आणि कृषी महामंडळाची योजना इत्यादीबद्दल उत्तरदात्यांना माहिती आहे.

शासकीय योजनांची माहिती असणारे उत्तरदाते शासकीय योजनांचा लाभ घेतात.

**5.** आंतरराज्यीय व्यापार हा निर्यात ठरू शकत नाही हे उत्तरदात्यांना माहितीच नाही असे त्यांचेशी झालेल्या चर्चेवरून लक्षात येते.निर्यातीपासून फायदा होत नाही असे म्हणणा-या उत्तरदात्यांचे प्रमाण खूप जास्त असून ते एकूण 79 प्रतिशत आहे.

**शिफारशी :-**

**1.** अनेक शेतकरी फक्त शेती आणि शेतीचाच व्यवसाय करतात. त्यांनी शेती सोबतच इतर दुय्यम व्यवसायही करावेत. शेतीमध्ये सुध्दा फळ शेती, फुल शेती, औषधी वनस्पतींची शेती करायला हरकत नाही. सोबतच कुक्कुट पालन, शेळी-मेंढी पालन, तितर-बटेर पालन, ससे पालन, दुग्ध व्यवसाय यासारखे व्यवसाय करायला काहिही हरकत नाही.

**2.** सोयाबीनच्या शेतीला फारशी सिंचनाची आवश्यकता नसते. मात्र गरज पडल्यास प्रत्येक शेतक-याने तशी व्यवस्था करून ठेवावी. ग्रामीण भागामध्ये ग्रामपंचायतींनी शासनाच्या विविध योजना शेतक-यापर्यंत पोहोचवाव्यात. त्यामध्ये दप्तर दिरंगाई होऊ नये.

**3.** सोयाबीन लागवडीसाठी बीयाणे निवडतांना प्रमाणीत बीयाणे वेगळे करून त्याचा प्रयोग करावा.

**4.** शेतकरी हा अनेकदा आर्थिक अडचणी मध्ये असतो अशा वेळी विक्रेते आणि दलालांनी त्यांना आर्थिक मदत करावी. बाजारभावानुसार त्यांच्या मालाला रास्त भाव द्यावा. शासनाने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून त्यावर नियंत्रण ठेवावे आणि शेतक-यांची होणारी हेळसांड आणि पिळवणूक यावर नियंत्रण ठेवावे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


1. Ali N., Gandhi A.P., Ojha T.P. (2010), Soybean Processing, Central Institute of Agriculture Engineering, Bhopal, P.No. 317-318.
2. Gandhi A.P., Kulkarni S.D., Jha Krishna (Dec. 2008), Soybean Processing & Utilization, Central Institute of Agriculture Engineering, Bhopal, P.No. 30-32.
3. देशपांडे आशुतोष (2006), सोयाबीन व आपला आहार, मातृभूमी फाऊंडेशन, बुलडाणा, पा.नं. 3-6.
4. देशमुख राजाभाऊ (1999), तेलबिया पिकांचे सुधारित लागवड तंत्र, संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, पा.नं. 25-31.
5. लोमटे दिनेश, पाटगांवकर दिप्ती (2016), सोयाबीन उत्पादन वाढीची सूत्रे, टेक नॉ पब्लिकेशन, पुणे, पा.नं. 7, 8, 11, 48, 49, 85, 97, 99.
6. गंगराडे सुनिल (2008), सोयाबीन की उन्नत खेती (हिंदी), कृषक जगत, भोपाल, पा.नं. 41-52.
7. http://www.21 food.com
8. http://www.soybean.org
9. www.globalsoybeanproduction.com